(1)

क्र.महसूल/कक्ष-१/टे-३/एनएपी/खारबांव-भिवंडी/
एसआर-०९/२०१५
जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
दिनांक 22 JUL 2016

वाचले :-

१) श्री. पांडुरंग दिनानाथ कारभारी व इतर यांचे कु.मु. श्री. किशोर वेरशी भानुशाली व इतर रा. १०४, हिंगलाज बिल्डींग, विनायक मंदिर रोड, भाईंदर (प), जि.ठाणे यांचा दिनांक १६/२/२०१५ रोजीचा अर्ज

२) सहाय्यक संचालक नगररचना ठाणे यांचेकडील शिफारस जा.क्र. बिशेप/रेखांकन/बांधकाम/ मौ.खारबांव/ ता.भिवंडी/३०२/संसठाणे दि. १२/२/२०१५ व जा.क्रं. संसनर/ठाणे मौ.खारबांव/ ता.भिवंडी /स्थळपहाणी/१३२२ दि. १७/६/२०१५

३) "दैनिक महाराष्ट्र जनमुद्रा" या वृत्तपत्रामध्ये दिनांक २४/२/२०१५ व "दैनिक भिवंडी दर्पण" या वृत्तपत्रामध्ये दि. २८/२/२०१५ रोजी प्रसिध्द केलेला जाहिरनामा.

४) तहसिलदार भिवंडी यांचेकडील अहवाल क्र.मशा/कक्ष-१/टे-१०/जमिनबाब/अ.प./एसआर-४४/२०१५ दि. २०/४/२०१५ व क्र.मशा/कक्ष-१/टे-१०/जबा/कावि-०७/२०१६ दि. २/७/२०१६

५) उपविभागीय अधिकारी भिवंडी विभाग भिवंडी यांचेकडील क्र बिडी/महसुल/टे-३/भुसं/कावि-३८०४ दि. ३/६/२०१५

६) उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) लघु पाटबधारे ठाणे ५ वा मजला क्र भुसंपादन/ एसआर/टे-१/वशि-१०० दि. ३१/०३/२०१५

७) उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर -३ ठाणे क्र भुसं/मे.सें.३/एसआर-८३३ दि. २/३/२०१५

८) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांचेकडील जा.क्र.ठाजिप/ग्राप/तक्रार-२/वशी-३० दि. ११/०२/२०१६

९) अप्पर तहसिलदार (अकृषिक) भिवंडी यांचेकडील क्र.अनधिकृत बांधकाम/खारबांव/एसआर क्र. ५५३/२०१६ दि. १४/६/२०१६ व क्र.अनधिकृत बांधकाम/खारबांव/एसआर क्र. ५५४/२०१६ दि. १४/६/२०१६

१०) उपविभागीय अधिकारी भिवंडी, विभाग भिवंडी यांचेकडील क्र. बीडी/महसूल/गौख/एसआर/११ दि.०६/०२/२०१४

११) अर्जदार यांनी दिलेले दिनांक ३/३/२०१५ चे क्षतपूर्ती बंधपत्र.

१२) अर्जदार यांनी दिलेले दिनांक ५/५/२०१५ चे सत्यप्रतिज्ञापत्र

१३) अर्जदार यांनी दिलेले दिनांक २२/६/२०१६ चे हमीपत्र

---

आदेश :-

ज्या अर्थी उपोद्घातातील अ.क्र. १ अन्वये ठाणे जिल्हयातील भिवंडी तालुक्यातील मौजे खारबांव, ता.भिवंडी येथील स.क्रं. २५६ हि.नं. ४ क्षेत्र २१००.०० चौ.मी. पैकी ८५०.०० चौ.मी., स.नं. २५६ हि.नं. ६ क्षेत्र १३००.०० चौ.मी., स.नं. २५६ हि.नं. १५ क्षेत्र ७००.०० चौ.मी., स.नं. २५६ हि.नं. १७ क्षेत्र ९००.०० चौ.मी. स.नं. २५६ हि.नं. २३/१ क्षेत्र ६००.०० चौ.मी. स.नं. २५६ हि.नं. २३/२ क्षेत्र ७००.०० चौ.मी., स.नं. २५६ हि.नं. २४ क्षेत्र १०९००.०० चौ.मी. पैकी ४६००.०० चौ.मी., स.नं. २५६ हि.नं. ३० क्षेत्र ६००.०० चौ.मी., स.नं. २५६ हि.नं. ३१ क्षेत्र १३००.०० चौ.मी. पैकी ६५०.०० चौ.मी. व स.नं. २५६ हि.नं. ३८ क्षेत्र १८००.०० चौ.मी.अशा एकूण १२७००.०० चौ.मी. एवढया जागेचा रहिवास (समुह निवास) या बिगरशेतकी प्रयोजनार्थ वापर करण्याची परवानगी मिळण्याबाबत अर्ज करण्ेत आलेला आहे.

Scanned by CamScanner

क्र.महसूल/कक्ष-१/टे-३/एनएपी/खारबांव-भिवंडी/
एसआर-०९/२०१५

ज्या अर्थी, या कार्यालयाने दि. २४/२/२०१५ रोजी "दैनिक महाराष्ट्र जनमुद्रा" व दि. २८/२/२०१५ रोजी "दैनिक भिवंडी दर्पण" या वृत्तपत्रात जाहिरात दिलेली होती. त्यावर मुदतीत हरकत/तक्रार उपलब्ध कागदपत्रे पाहता या कार्यालयाकडे प्राप्त झालेचे दिसून येत नाही.

ज्याअर्थी, जमिनीस आदिवासी हस्तांतरण कायद्याच्या तरतुदी लागू होतात अगर कसे या मुद्याबाबत "अशी बाब नाही" असे तर परवानगी मागीतलेल्या व ७/१२ चे कब्जेदार सदरी असलेल्या व्यक्तीचे मालकीहक्क निर्विवाद आहेत अगर कसे, या मुद्याबाबत 'होय' असे अभिप्राय तहसिलदार भिवंडी यांनी उपोद्घातातील अ.क्र. ४ च्या अहवालामध्ये दिलेले आहेत.

ज्याअर्थी, अर्जदार यांनी सहाय्यक संचालक नगररचना ठाणे यांचेकडे केलेल्या अर्जानुसार सहाय्यक संचालक नगररचना ठाणे यांनी त्यांचे जा.क्र. बिशेप/रेखांकन/बांधकाम/ मौ.खारबांव/ ता.भिवंडी/३०२/संसठाणे दि. १२/२/२०१५ अन्वये मौजे खारबांव, ता.भिवंडी येथील स.नं. २५६/४पै, २५६/६, २५६/१५, २५६/१७, २५६/२३/१, २५६/२३/२, २५६/२४पै, २५६/३०, २५६/३१, २५६/३८ एकूण क्षेत्र १२७००.०० चौ.मी. क्षेत्रावर रहिवास (समुह निवास) या वापरासाठी अभिन्यास व बांधकाम नकाशांना मंजुरी व बिनशेती परवानगीची शिफारस अटी / शर्तीना अधिन राहून केली आहे.

त्याअर्थी आता महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे निहित करण्यांत आलेल्या अधिकारांचा वापर करुन उक्त जिल्हाधिकारी ठाणे याद्वारे काशिनाथ गणपत काठे, मधुकर, दुर्योधन गणपत काठे, सोनिबाई बाळाराम भोईर, हिराबाई रामचंद्र वारघडे, शारदा विठ्ठल म्हात्रे, निराबाई वासुदेव पाटील, निर्मला अरविंद काठे, राहुल अरविंद काठे, ऋषिकेश अरविंद काठे, अनिकेत अरविंद काठे, विजय एकनाथ मुकादम, रविंद एकनाथ मुकादम, जयश्री रमण म्हात्रे, पांडुरंग दिनानाथ कारभारी, एकनाथ चंद्रया मुकादम, यशवंत चंद्रया मुकादम, मंगलदास चंद्रया मुकादम, निराबाई विश्वनाथ ठाकुर, ताराबाई भिवा पाटील, वैभव भगवान पाटील, रुपाली भालचंद्र पाटील, गंगाराम लक्ष्मण भोईर, शंकर राम मुकादम, झिपन्या गोपाळ पाटील, दुर्योधन हालोजी पाटील, नागु हालोजी पाटील, सुंदर नारायण भोईर, रविकांत झिपन्या पाटील, दुर्योधन झिपन्या पाटील, गोपिनाथ झावऱ्या पाटील, अरविंद झावऱ्या पाटील, शांतुबाई भालचंद्र पाटील, सुमती रामदास पाटील, धृपद अनंता पाटील, मंगलदास चिंतामण पाटील, अनंत चिंतामण पाटील, गजानन चिंतामण पाटील, शकुंतला गोरखनाथ पाटील, मटलीबाई चिंतामण पाटील, दिलीप शांताराम पाटील, प्रदिप गुरुनाथ पाटील, किरण गुरुनाथ पाटील, योगेश गुरुनाथ पाटील, प्रेमाबाई गुरुनाथ पाटील, कल्पेश अनिल खंडागळे यांना मौजे खारबांव, ता.भिवंडी, येथील स.क्र. २५६ हि.नं. ४ क्षेत्र २१००.७० चौ.मी. पैकी ८५०.०० चौ.मी., स.नं. २५६ हि.नं. ६ क्षेत्र १३००.०० चौ.मी., स.नं. २५६ हि.नं. १५ क्षेत्र ७००.०० चौ.मी., स.नं. २५६ हि.नं. १७ क्षेत्र ९००.०० चौ.मी. स.नं. २५६ हि.नं. २३/१ क्षेत्र ६००.०० चौ.मी. स.नं. २५६ हि.नं. २३/२ क्षेत्र ७००.०० चौ.मी., स.नं. २५६ हि.नं. २४ क्षेत्र १०९००.०० चौ.मी. पैकी ४६००.०० चौ.मी., स.नं. २५६ हि.नं. ३० क्षेत्र ६००.०० चौ.मी., स.नं. २५६ हि.नं. ३१ क्षेत्र १३००.०० चौ.मी. पैकी ६५०.०० चौ.मी. व स.नं. २५६ हि.नं. ३८ क्षेत्र १८००.०० चौ.मी. असे एकूण १२७००.०० चौ.मी. क्षेत्र हिशेबित होत असून सदर क्षेत्राबाबत सहाय्यक संचालक नगररचना ठाणे यांनी शिफारस व बांधकाम आराखडे मंजुर केले आहे. सहाय्यक संचालक नगररचना ठाणे यांची शिफारस पाहता त्रिकोणमितीनुसार येणारे १२२९७.२३ चौ.मी. क्षेत्र विचारात घेण्यात आले असून सदर १२२९७.२३ चौ.मी. क्षेत्रास रहिवास (समुह निवास) या बिगरशेतकी प्रयोजनार्थ वापर करण्याबाबत पुढील शर्तीवर अनुज्ञा (परमिशन) देण्यांत येत आहे.

त्या शर्ती अशा :-

१. ही परवानगी अधिनियम खाली केलेले नियम यांना अधिन ठेवून देण्यांत आलेली आहे.

२. सहाय्यक संचालक नगररचना ठाणे यांनी मंजुरीची शिफारस केलेल्या आराखडयातील भुखंड, रस्ते व प्रस्तावित इमारतीची प्रत्यक्ष जागेवर प्रथमतः विस्तृत आखणी करुन ती उप अधिक्षक भुमि अभिलेख भिवंडी यांचेकडून मोजणी करुन घेऊन आखणी करुन घेणे आवश्यक आहे. आखणी करीत असतांना सभावेतालच्या मंजुर अभिन्यासातील रस्ते व हद्दी यांचेशी योग्य रितीने समन्वय साधणे आवश्यक आहे. सदरची कार्यवाही झालेशिवाय जागेवर कोणतेही विकासकार्य करण्यात येऊ नये. तसेच प्रत्यक्ष मोजणीचे वेळी एकूण भूखंडाच्या क्षेत्रामध्ये रेखांकनात दर्शविलेल्या भूखंडाच्या क्षेत्रात व हद्दीत तफावत आढळल्यास वा त्यानुसार प्रस्तावित बांधकाम क्षेत्र कमी जास्त होत असल्यास तसेच सहाय्यक संचालक नगररचना ठाणे यांचेकडील मंजुर बांधकाम आराखडयानुसार प्रस्तावित सामासिक अंतरामध्ये फरक पडत असल्यास त्याप्रमाणात बांधकाम क्षेत्र कमी करुन अथवा दुरुस्त करुन सुधारीत रेखांकन/बांधकाम नकाशे मंजुर करुन घेणे अनुज्ञाग्राही यांचेवर बंधनकारक राहील.

३. विषयांकीत जागा किंवा तीचा भाग कोणत्याही प्राधिकरणामार्फत अथवा राज्य अथवा केंद्र शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत अथवा राज्य शासनाचे नियंत्रणाखालील कोणत्याही महामंडळामार्फत संपादन केलेली नाही अथवा आज रोजी संपादनाची कोणतीही कार्यवाही सुरु नाही असे दिनांक ०३/०३/२०१५ अन्वये अनुज्ञाग्राही यांनी सादर केलेल्या क्षतीपूर्ती बंधपत्रास अधिन राहून ही परवानगी देणेत आली आहे.

४. जमिनीचे मालकी हक्क निर्विवाद असलेचे अर्जदार यांनी प्रतिज्ञापत्रात लिहून दिले असलेने नियोजीत भूखंडाच्या मालकी हक्क अथवा हद्दीबाबत, मार्ग सुगमताबाबत भविष्यात कोणताही वाद उत्पन्न झाल्यास त्याचे निराकरण अर्जदार यांनी करणे त्यांचेवर बंधनकारक राहील व ती सर्वस्वी जबाबदारी अर्जदार यांची राहील.

५. प्रस्तावित जमिनीबाबत अर्जदार यांनी सहाय्यक संचालक नगररचना ठाणे यांचेकडे दाखल केलेल्या नकाशांना सहाय्यक संचालक नगररचना ठाणे यांनी शिफारस केली आहे. अर्जदार यांनी सहाय्यक संचालक नगररचना ठाणे यांचेकडे दाखल केलेल्या व त्यांनी शिफारस केलेल्या नकाशावरील जमीन मालक / कुळमूखत्यारपत्राधारक यांचे स्वाक्षरीबाबतची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार यांची राहील.

६. नियोजीत रेखांकनाखालील जागेतील सांडपाणी अथवा भूपृष्ठीत पाणी वाहून नेण्यासाठी जे मार्ग असतील ते अबाधित ठेवावे लागतील त्याचा अथवा इतरांना त्रास होणार नाही. अशा रितीने बंदोबस्त करणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

७. नियोजीत जागेचा वापर सहाय्यक संचालक नगररचना ठाणे यांनी मंजुरीची शिफारस केलेल्या बांधकाम नकाशात दर्शविल्याप्रमाणे फक्त रहिवास (सिंगल फॅमिली हाऊस) या प्रयोजनासाठी करण्यात यावा.

८. नियोजीत वापर सुरु करणेपूर्वी रेखांकनातील रस्ते, त्यांचे गटारासह वाहतुकीस योग्य होतील असे पक्क्या स्वरुपात बांधण्यात यावेत व त्याची रुंदी सहाय्यक संचालक नगररचना ठाणे यांनी मंजुरीची शिफारस केलेल्या रेखांकनाप्रमाणे ठेवण्यात यावे.

९. नियोजीत बांधकाम प्रस्तावाखालील खुली जागा ही प्रत्यक्ष जागेवर एकुण क्षेत्राच्या १/१० टक्के एवढया क्षेत्राची असली पाहीजे व ती कोणत्याही बांधकामाव्यतिरिक्त कायम खुली ठेवण्यात यावी. तिचा उपयोग बाग, क्रीडांगण, अशा स्वरुपात करण्यात यावा.

१०. प्रस्तावित जमीन उच्चतम भरतीरेषेपासून (खाडीकरिता) १५०.०० मी. अंतरापलीकडे असल्याने सदर जमिनीस सन २०११ ची सी.आर.झेड. अधिसूचना लागू होणार नाही व सदर जमीन सि.आर.झेड. क्षेत्राच्या बाहेर आहे असे महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटी (MCZMA) ने दि. १०/०९/२०१४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तरी भविष्यात सि.आर.झेड.बाबत काही प्रश्न उद्भवल्यास त्याचे निराकरण करणेची सर्वस्वी जबाबदारी अनुज्ञाग्राही यांची राहील.

Scanned by CamScanner